मिरा भाईंदर महानगरपालिका
बाजार विभाग
मुख्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28193081
ई-मेल आयडी market@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/बाजार/ 28 /2026-27 दि.15 /10 /2026

**प्रति,**
**मा.जनसंपर्क अधिकारी,**
**जनसंपर्क विभाग,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- प्रेसनोट प्रसिध्द करणेबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये बाजार विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांना आवाहन करणेबाबत प्रेसनोट तयार करण्यांत आली असुन. सदरची प्रेसनोट वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत यावी.

प्रेसनोट प्रसिध्दी केलेबाबत वर्तमानपत्र बाजार विभागास देणेत यावी ही विनंती.

**सोबत :- प्रेसनोट जोडली आहे.**

**(दत्तात्रय वरकुटे)**
**सहा आयुक्त (बाजार विभाग)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**// प्रेसनोट//**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ना फेरीवाला क्षेत्रातील बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुली करणे कामी मे. ODS Protective Services Pvt. Ltd., यांना महानगरपालिका बाजार विभागाने जा.क्र.मनपा/बाजार/29/2024-25 दि.30/09/2024 अनव्ये 3 वर्षाकामी कार्यादेश देण्यात आला आहे.

बाजार फी वसुली करणे कामी महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार मे. ODS Protective Services Pvt. Ltd., यांना करारनाम्यातील अट क्र.07 नुसार फेरीवाल्यांना हस्तलिखित पावती देऊन किंवा पी.ओ.एस (POS) द्वारे बाजार फी शुल्क गोळा करण्याची तरतूद आहे. ठेकेदार 1 वर्षापेक्षा जास्त काळापासून महानगरपालिका मार्फत छापील पावतीनेच बाजार फी वसुली गोळा करीत होता. परंतु अचानक ठेकेदारानी महानगरपालिकेला माहिती न देता QR CODE आधारे फेरीवाल्यांना आयडी कार्ड वाटप होत असल्याबाबत तक्रारी तसेच वृत्तपत्रात, सोशल मीडिया माध्यमाद्वारे मोठ्याप्रमाणात बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. त्याअनुषंगाने ठेकेदार मे. ODS Protective Services Pvt. Ltd., यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला असता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांना बाजार फी वसुली करीता मे. ODS Protective Services Pvt. Ltd., यानी QR CODE / UPI / POS द्वारे डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आयडी कार्ड बनवून त्यावर चाचणी सुरु केली असल्याबाबत सकृतदर्शनी दिसून येते. सदरची चाचणी प्रक्रिया तात्काळ थांबविण्यात आली आहे. तसेच सदर वाटप केलेले हॉकर आयडी कार्ड ठेकेदारांनी परत घेतल्याबाबत पत्र दिलेले आहे.

सदर कंत्राटदारामार्फत QR Code/UPI/POS इत्यादी डिजिटल माध्यमातून बाजार फी संकलनाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. तथापि, सदर प्रक्रियेच्या अनुषंगाने QR Code, डिजिटल पावती किंवा कोणत्याही कार्डाच्या आधारे एखाद्या व्यक्तीस महानगरपालिकेने फेरीवाला म्हणून अधिकृत मान्यता, व्यवसाय परवाना अथवा फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करण्याचा अधिकार दिलेला समजला जाणार नाही.

फेरीवाला म्हणून नोंदणी/अधिकृतता ही केवळ महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकरणाकडील अधिकृत नोंदी व लागू नियमांनुसारच ग्राह्य राहील. कोणत्याही कंत्राटदाराने दिलेले कार्ड, QR Code, डिजिटल पावती किंवा तत्सम दस्तऐवज हा स्वतंत्र फेरीवाला परवाना किंवा व्यवसायाची परवानगी समजण्यात येऊ नये.

तरी अशा डिजिटल पावतीने अथवा कार्डमुळे कोणताही फेरीवाला अधिकृत घोषित होणार नाही. यांची संबंधित फेरीवाल्यांनी नोंद घ्यावी.

तसेच सर्व फेरीवाल्यांना सुचित करण्यात येते की यापुढे बाजार फी वसुली पूर्वी प्रमाणे महानगरपालिका मार्फत छापील पावतीनेच करण्यात येईल. त्यानुसार बाजार फी चा भरणा करणेस मिरा भाईंदर महानगरपालिके तर्फे सर्व फेरीवाल्यांना आवाहन करण्यात येत आहे.

(प्रणाली घोंगे)
उपायुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने)